॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आदिवासी वारसा ओळख आणि अस्तित्वाचा उत्सव (सेलिब्रेटींग ट्रायबल हेरीटेज फॉर इटस आयडेंटीटी ॲण्ड एक्झिस्टन्स) या राष्ट्रीय चर्चासत्रात उद्या शुक्रवार दि. २८ मार्च रोजी सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थिनी सन्मान योजने अंतर्गत ९ विद्यार्थिनींचा सन्मान केला जाणार आहे.

विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सन २०२४-२५ पासून सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थिनी सन्मान योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत अशिक्षीत किंवा अल्पशिक्षित आई वडिलांच्या कुटूंबातील प्रथमच शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीला हा सन्मान देण्यात येणार आहे. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली व्य.प. सदस्य नितीन झाल्टे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने १० महाविद्यालयांमधून प्राप्त झालेल्या २३ विद्यार्थिनींच्या अर्जांची छाननी केली. त्यातून ९ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. व्य.प. सदस्य प्रा. सुरेखा पालवे, सिनेट सदस्य प्रा. किर्ती कमळजा, डॉ. विशाल पराते, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांचा या समितीमध्ये समावेश होता. ५ हजार रूपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे या सन्मानाचे स्वरूप आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजता आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते या विद्यार्थिनींचा सन्मान केला जाणार आहे. सन्मान पात्र विद्यार्थिनींचे नावे पुढील प्रमाणे १) पल्लवी बारेला (शरदचंद्रीका पाटील फार्मसी महाविद्यालय, चोपडा), २) ज्योती वसावे (महाराज जे.पी.वळवी महाविद्यालय, भडगाव),३ ) आफरीन खाटीक (राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा) ४) भाविका पाटील (आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, शिरपूर) ५) आरती पावरा (त्रिमुर्ती इन्स्टिट्यूट ऑफ फॉर्मसी, जळगाव), ६) अश्विनी गावीत (लोकनेते माणिकराव गावीत महाविद्यालय, विसरवाडी,ता. नवापूर), ७) पारबती पावरा, ८) वर्षा पाडवी, ९) निशा वसावे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा)

### बातमी नं. २

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत पूज्य साने गुरुजी संस्कार केंद्राच्या वतीने साने गुरुजींच्या विचारांवर आधारित घेण्यात आलेल्या लघुपट स्पर्धेत पुणे येथील शुभम बडकस याने प्रथम, मुंबईच्या पुजा देशमुखने द्वितीय पारितोषिक प्राप्त केले.

दिनांक २७ मार्च २०२५ रोजी या स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले यावेळी 'तरुणांसाठी साने गुरुजी' या विषयावर साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त गोपाल नेवे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे होते. तसेच विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. किशोर पवार, जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजी संस्कार केंद्राचे विभागप्रमुख डॉ. रोहन कोष्टी यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर निवडक लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच 'खरा तो एकची धर्म' आणि 'बलसागर भरत होवो' ही प्रेरणादायी गीते प्रगती अडावदकर हिने सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृपा देसले यांनी केले, तर शेवटी गौरव हरताळे यांनी आभार मानले. गोपाल नेवे यांनी साने गुरूजींचे विचार तरूणांसाठी आजही प्रेरणादायी असल्याचे सांगितले. प्रा. पगारे यांनी साने गुरूजी हे मानवतावादी होते असे सांगतांना काही उदाहरणे दिली.

**लघुपट स्पर्धेतील विजेते:** प्रथम पारितोषिक – खरा तो एकची धर्म (शुभम बडकस, पुणे), द्वितीय पारितोषिक – श्याम विरुद्ध श्याम (पूजा देशमुख, मुंबई), तृतीय पारितोषिक – संयुक्त विजेते: बेबी सरोजा (शुभम नेहारे, काटोल) आणि भूतदया (विनय संजय पाटील, जळगाव)

................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २६ मार्च, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी